पहिली भारत-लेबनॉन परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत बैठक

भारत आणि लेबनॉन दरम्यान'परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीची (एफओसी) 1ली फेरी 09 नोव्हेंबर 2026 रोजी नवी दिल्ली येथे पार पडली. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सचिव (सीपीव्ही आणि ओआयए) सुश्री श्रीप्रिया रंगनाथन यांनी केले, तर लेबनॉनच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व लेबनॉनच्या परराष्ट्र व्यवहार आणि स्थलांतरित मंत्रालयाचे सरचिटणीस श्री अब्देल सत्तार इस्सा यांनी केले.

2. या चर्चेत भारत-लेबनॉन द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण व्याप्तीचा आढावा घेण्यात आला आणि दोन्ही देशांमधील संस्थात्मक यंत्रणांना अधिक सक्रिय करण्याबाबत नव्याने वचनबद्धता दर्शवण्यात आली. दोन्ही बाजूंनी परस्पर हिताच्या महत्त्वाच्या प्रादेशिक मुद्द्यांवरही आपापली मते मांडली.

3. राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांच्या स्तंभांवर आधारित दोन्ही देशांमध्ये उबदार व सौहार्दपूर्ण द्विपक्षीय संबंध आहेत. आज झालेल्या चर्चेमुळे भारत-लेबनॉन द्विपक्षीय भागीदारी अधिक बळकट होण्यास मदत होईल.

4. सल्लामसलतीची पुढील फेरी परस्पर सोयीच्या तारखेला लेबनॉनमध्ये आयोजित करण्याचे उभय बाजूंनी मान्य केले.

नवी दिल्ली

09 नोव्हेंबर 2026